


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक १४१, बुधवार ३० एप्रिल २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## पंचायत समितीचे माजी सदस्य

# राजेंद्र चौधरी यांची अकाली एक्झिट

### नीलेश लंके प्रतिष्ठानचा ढाण्या वाघ हरपला । तालुक्यात हळहळ

नांदूरपठार : प्रतिनिधी

**पंचायत समितीचे माजी सदस्य, पूर्वाश्रमीचे स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे कट्टर समर्थक, नीलेश लंके प्रतिष्ठानचा ढाण्या वाघ म्हणून परिचित असलेले राजेंद्र भिकाजी चौधरी वय ५३ यांनी सोमवारी सायंकाळी सात वाजता अकाली एक्झिट घेतली. पुण्याच्या खाजगी रूग्णालयात हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले.**

बाळासाहेब ठाकरे यांचा कट्टर समर्थक म्हणून सन २००७ मध्ये चौधरी हे शिवसेनेच्या तिकीटावर पंचायत समिती सदस्य म्हणून विजयी झाले. त्यांनी आपल्या पदाच्या माध्यमातून अनेक विकास कामे मार्गी लावली. सर्वसामान्यांचे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख होती. अनेक शासकीय समित्यांवर त्यांनी काम केले. सध्या खंडोबा देवस्थानचे विश्‍वस्त म्हणून ते काम पाहत होते.

चौधरी यांच्या निधनाची बातमी सोमवारी सायंकाळी आठ वाजता सोशल मीडियाच्या माध्यमातून तालुकाभर वाऱ्यासारखी पसरली. ही बातमी ऐकूण अनेकांनी आश्रूंना मोकळी वाट करून दिली.

मंगळवारी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास चौधरी यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीस मोठा जनसमुदाय उपस्थित होता. खा. नीलेश लंके, आ. काशिनाथ दाते, बाळासाहेब नाहाटा, विकास रोहोकले, सुदाम पवार, सुवर्णा धाडगे, अशोक घुले, प्रकाश गाजरे, मोहन रोकडे, बापूसाहेब शिर्के, ठकाराम लंके, ॲड. राहूल झावरे, कारभारी पोटघन, बाळासाहेब दिघे, उपसभापती किसन सुपेकर, शिवाजी खिलारी, मारूती रेपाळे, डॉ. दीपक आहेर, शंकर नगरे, शिवाजी होळकर, अजय लामखडे, शिवाजी बेलकर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तसेच नीलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी, सभासद यावेळी मोठया संख्येने उपस्थित होते.

### प्रकृती ढासळली

पुण्याकडे जाताना चौधरी यांची प्रकृती स्थिर होती. मात्र तिथे पोहचेपर्यंत त्यांचा रक्तदाब कमी झाला होता. रूबी हॉल येथे त्यांनी उपचारास प्रतिसाद दिला नाही. त्यांची प्रकृती साथ देत नसल्याने त्यांच्यावर शस्त्रक्रीया होऊ शकली नाही. सोमवारी सायंकाळी सात वाजता त्यांचे प्राणोत्क्रमण झाले.





### रविवारी हृदयविकाराचा झटका

रविवारी सायंकाळी राजेंद्र चौधरी हे त्यांच्या टाकळी ढोकेश्वर येथील निवासस्थानी असताना त्यांना हृदयविकाराचा पहिला झटका आला. त्यांना तात्काळ नगर येथे हालविण्यात आले. डॉक्टरांनी त्यांची तपासणी केली असता त्यांच्या रक्तवाहिन्या शंभर टक्के ब्लॉक असल्याचे निदर्शनास आली. त्यांची ॲन्जोग्राफी, ॲन्जोप्लास्टी करण्यात आली.

### खा. लंके यांची रूग्णालयात धाव

सोमवारी सकाळी त्यांना श्‍वसनासाठी लावण्यात आलेली कृत्रीम श्‍वसनयंत्रणा काढण्यासंदर्भात डॉक्टरांकडून विचारणा करण्यात आल्यानंतर चौधरी यांच्या चिरंजीवाने खा. नीलेश लंके यांचे बंधू दीपक लंके यांच्याशी संपर्क केला. लंके यांनी डॉक्टरांशी चर्चा करून त्यासंदर्भात खा. लंके यांना माहीती दिली. खा. लंके यांनी तात्काळ नगरच्या रूग्णालयात जात चौधरी यांच्या प्रकृतीची माहीती घेतली.

### खा. लंके ढसढसा रडले

खा. नीलेश लंके यांच्या राजकीय वाटचालीत राजेंद्र चौधरी यांचा मोलाचा वाटा होता. लंके यांच्या सुख दुःखात चौधरी हे अग्रभागी असत. अलिकडेच पार पडलेल्या विधानसभा निवडणूकी राणी लंके यांच्यासमवेत ते संपूर्ण प्रचारकाळात दररोज बरोबर असत. अनेक वर्षांचा सहकारी अकाली निघून गेल्याने खा. लंके यांना अतिव दुःख झाले. अंत्यविधीप्रसंगी ढसढसा रडत त्यांनी आपल्या भावनांना मोकळी वाट करून दिली.

### ओपन हार्ट सर्जरीचा सल्ला

खा. लंके यांनी डॉक्टरांशी चर्चा केल्यानंतर हृदयविकाराच्या झटक्यामुळे चौधरी यांच्या हृदयाचा पडदा फाटल्याचे सांगण्यात आले. त्यासाठी ओपन हार्ट सर्जरीचा सल्ला देण्यात आला. खा. लंके यांनी तात्काळ पुण्याच्या रूबी हॉल क्लिनिकच्या डॉक्टरांशी संपर्क करून चौधरी यांच्या शस्त्रक्रियेची तयारी करण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर कार्डीयाक ॲब्युलन्सने चौधरी यांना पुण्यास हलविण्यात आले. खा. नीलेश लंके हे देखील त्यांच्या समवेत होते.

# पारनेर नगरपंचायतीस ६ कोटींचा निधी

### आ. काशिनाथ दाते यांची माहिती

पारनेर : प्रतिनिधी



**पारनेर नगरपंचायतच्या विविध प्रभागांमधील ४२ विकास कामांसाठी ६ कोटी रूपयांचा निधी मंजुर झाल्याची माहिती आमदार काशिनाथ दाते यांनी दिली. या आणि दिशा मंजुरीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे विशेष सहकार्य लाभले आमदार दाते यांनी सांगितले.**

### काँक्रीटीकरण

प्रभाग ६ सिध्देश्‍वरवाडी रोड ते किसान स्कुल १५ लाख, प्रभाग ६ अळकुटी रोड ते लक्ष्मण चेडे घर, १० लाख, अळकुटी रोड ते शिवाजी चेडे घर ५ लाख, प्रभाग १४ पानोली रोड ते सुनिल औटी घर २० लाख, ठोंबरे वस्ती ते तुकाराम औटी घर २० लाख प्रभाग २ भाऊ थोरात ते शिवाजी काळे रस्ता १० लाख, प्रभाग ४ सोंड वस्ती ते भास्कर कावरे घर १५ लाख, प्रभाग १४ सिध्देश्‍वरवाडी रस्ता ते दत्तू बाजीराव चेडे रस्ता १५ लाख, प्रभाग ३ संडक मळा ते अंबुले वस्ती १० लाख, प्रभाग १६ गायकवाड तलाव ते लांडे वस्ती २० लाख, प्रभाग १६ खेडेकर वस्ती ते जोगेश्‍वरी मंदिर २० लाख, प्रभाग १६ भिसे वस्ती ते सुपा रोड २० लाख, कारभारी कावरे ते मोहन कावरे घर १५ लाख, प्रभाग ३ तराळवाडी ते लोणी रोड १५ लाख, प्रभाग ४ वैद्य वस्ती ते बुगेवाडी रस्ता २० लाख, प्रभाग ३ जामगांव रस्ता ते शांताराम कावरे वस्ती १५ लाख, पुणेवाडी रस्ता ते बोरूडे मळा रस्ता सोबलेवाडी रस्ता १५ लाख, करंदी रस्ता ते सुभाष म्हस्के वस्ती १५ लाख, करंदी रस्ता ते पोपट नाना औटी रस्ता १० लाख, करंदी रस्ता ते गोरख मारूती औटी वस्ती १० लाख, पुणेवाडी रोड ते बहिरू पुजारी वस्ती १० लाख, पुणेवाडी रस्ता ते रमेश म्हस्के वस्ती १० लाख.

### स्ट्रीट लाईटसाठी प्रत्येकी १५ लाख

प्रभाग क्र. ६ मध्ये पुणेवाडी फाटा ते वरची वेस, प्रभाग क्र. ५ सोबलेवाडी फाटा ते वरची वेस, प्रभाग १४ हिंद चौक ते चित्रा गार्डन, खालची वेस ते कुलट वस्ती, प्रभाग १६ बस स्थानक ते गणपती फाटा, प्रभाग ९ आंबेडकर चौक ते लोणी रोड खडके वस्ती

### स्ट्रीट लाईटसाठी २० ते ५ लाख निधी

प्रभाग क्र. ११ मध्ये वरची वेस ते खाली वेस २० लाख, प्रभाग क्र. ६ अळकुटी रोड ते सिध्देश्‍वर मंदीर २० लाख, प्रभाग ११ कल्पना शिंदे घर ते तक्का परिसर बखळ गल्ली २० लाख, प्रभाग ११ गणपती गल्ली ५ लाख. प्रभाग १३ संपूर्ण प्रभाग १० लाख.

### विविध कामांचा निधी

प्रभाग १३ क्रांती चौक सुशोभीकरण १० लाख, प्रभाग ४ हनुमान मंदीर सभामंडप १५ लाख, प्रभाग १० मुळे घर ते गायकवाड तलाव रस्ता डांबरीकरण २० लाख, प्रभाग ३ स्मशानभुमी १० लाख, प्रभाग १ संपूर्ण प्रभागात स्ट्रीट लाईट १० लाख, प्रभाग ४ बुगेवाडी रोड ते पोदार स्कुल रस्ता डांबरीकरण १० लाख , प्रभाग १ सोबलेवाडी ते पुणेवाडी फाटा ते बेंद वस्ती रस्ता डांबरीकरण २० लाख, सोबलेवाडी, कान्हूर, पारनेर रस्ता ते भैरवनाथ मंदिर रस्ता डांबरीकरण व दुरूस्ती १० लाख.

### मुलभूत प्रश्न मार्गी लावणार

सन २००२ मध्ये जिल्हा परिषदेच्या निवडणूकीत शहराने मला आघाडी दिली. २००४ च्या पोटनिवडणूकीत १ हजार १३४ तर विधानसभेला २ हजार ८०० मतांची आघाडी दिली. माझ्यावर प्रेम करणाऱ्या पारनेरकरांचा विकास करण्याचे माझे ध्येय आहे. शहराचे मुलभूत प्रश्न मार्गी लावणार आहोत.

आमदार काशिनाथ दाते
विधानसभा सदस्य

### सर्वाधिक निधी

आ. काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून शहराच्या इतिहासात सर्वाधिक निधी प्राप्त झाला आहे. यापुढील काळात शहराचा कायापालट होणार आहे. शहरात उद्यान, आंबेडकर भवन उभे राहीले पाहिजे ही कामे आ. दाते यांच्या माध्यमातून मार्गी लागतील.

युवराज पठारे, नगरसेवक

### विकासाचे नाते काशिनाथ दाते !

आ. काशिनाथ दाते हे विकास पुरूष आहेत. त्यांनी पारनेरकरांना दिलेला शब्द चार महिन्यात साडेसहा कोटींचा निधी देऊन पाळला. पारनेरच्या पाणी योजनेचा प्रश्नही आ. दाते यांच्या माध्यमातून मार्गी लागणार आहे.

अशोक चेडे, नगरसेवक

# प्रियकराच्या मदतीने पत्नीकडून पतीची हत्या

### अपघाताचा बनाव रचून दिशाभूल करण्याचा प्रयत्न । सात दिवसांच्या प्रयत्नानंतर प्रियकराला गुजरातमधून अटक,पत्नीही अटकेत

निघोज : प्रतिनिधी

**परप्रांतीय तरुणासोबत असलेल्या अनैतिक संबंधात अडथळा ठरणाऱ्या पतीची, प्रियकराच्या मदतीने निर्घृण हत्या करण्याचा प्रकार उघडकीस आल्याने निघोज परिसरात खळबळ उडाली आहे.बाबाजी शिवाजी गायखे वय ३२,मूळ राहणार काळेवाडी, सावरगांव, पारनेर) असे दुर्दैवी पतीचे नाव आहे.**

दरम्यान खून करून फरार झालेला प्रियकर जनकभाई भुपतभाई भिडभिडीया याला पारनेर पोलिसांनी गुजरातमधून ताब्यात घेतले आहे.त्यासाठी पोलिसांचे पथक गुजरातमध्ये आठ दिवस ठाण मांडून बसले होते.पत्नी सुप्रिया बाबाजी गायखे (वय २७)

उर्वरीत पान ३ वर



### दीड वर्षापूर्वी जुळले सुप्रियाशी सूत!

निघोज परिसरात घरोघरी जाऊन साड्या विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या जनकभाई भिडभिडीया या गुजराती व्यवसायिकाशी सुप्रियाचे दीड वर्षांपूर्वी सूत जुळले.त्याची कुणकुण पती बाबाजीला लागली होती.त्यामुळे पती पत्नीमध्ये वारंवार वाद होत.

### तरीही सुप्रिया निर्विकार !

बाबाजी व सुप्रिया यांना नऊ व पाच वर्षांच्या दोन मुली आहेत.वडिलांची हत्या झाली तर आई हत्येच्या आरोपावरून तुरुंगात असल्याने या दोन्ही मुली अनाथ झाल्या आहेत. दरम्यान पतीच्या हत्येचा पश्‍चाताप सुप्रियाला झालेला नाही.पती आपल्याला नेहमी त्रास देत असे.त्याचे घराकडे, मुलींकडे लक्ष नव्हते असे ती निर्विकारपणे सांगत असते.

## दत्तात्रय रोकडे खविसचे चेअरमन प्रसाद शितोळे यांची व्हाईस चेअरमनपदी वर्णी



पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर तालुका खरेदी विक्री संघाच्या चेअरमनपदी दत्तात्रय जयराम रोकडे तर व्हाईस चेअरमनपदी प्रसाद भरतराव शितोळे यांची मंगळवारी बिनविरोध निवड झाली.**

संघाच्या पंचवार्षिक निवडणूकीमध्ये महायुती पुरस्कृत पॅनलने सर्व जागा जिंकत राष्ट्रवादी काँग्रेसला धोबीपछाड देत संघावरील सत्ता कायम राखली होती. त्यावेळी ॲड. बाबासाहेब खिलारी यांची चेअरमनपदी तर व्हाईस चेअरमनपदी गंगाधर रोहोकले यांची बिनविरोध निवड झाली होती. ठराविक कालखंडानंतर दोन्ही पदाधिकारी राजीनामे देतील व त्यानंतर इतर संचालकांना संधी देण्यात येईल असे सुत्र त्यावेळी ठरले होते. ठरलेल्या सुत्रानुसार ॲड. खिलारी व रोहोकले यांनी आपआपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या पदांवर पदाधिकाऱ्यांची निवड करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक विकास जाधव यांनी मंगळवार दि. २९ रोजी संचालक मंडळाच्या विशेष सभेचे आयोजन केले होते.

उर्वरीत पान ३ वर

## आझाद ठुबेसह २१ आरोपींना नाशिकला हलविले

### बाजीराव पानमंद, पोपट ढवळे, साहेबराव जऱ्हाडचाही समावेश

पारनेर : प्रतिनिधी

**राजे शिवाजी पतसंस्थेच्या गैरव्यवहारातील प्रमुख सुत्रधार, संस्थेचा चेअरमन, जिल्हा परिषदेचा माजी सदस्य आझाद प्रभाकर ठुबे याच्यासह गोरेश्‍वर पतसंस्थेचा चेअरमन बाजीराव पानमंद, राजे शिवाजीमधील आरोपी पोपट ढवळे तसेच कान्हुर पठारच्या जनता विद्यालयाचा उपशिक्षक साहेबराव जऱ्हाड यांच्यासह न्यायालयीन कोठडीतील २१ आरोपींना नाशिकच्या कारागृहात हालविण्यात आले आहे.**




यासंदर्भात मिळालेल्या माहीतीनुसार आझाद ठुबे याने कोठडीमध्ये पुरेसे पाणी मिळत नसल्याची तक्रार जेलरकडे केली होती. ही बाब जेलरने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर

उर्वरीत पान ३ वर







We are hiring.. HITAY

| Sr. No. | Designation | Vacancies | Experience | Education |
|---|---|---|---|---|
| 1 | Plant Manager | 1 | More than 5 years Exp | BE (Op or Prod)/Btech (Food)or similar |
| 2 | Quality Officer/Executive | 1 | 2 to 3 Years Exp | Msc Chem/ food science, Btech Food |
| 3 | Machin Operators | 4 | 1 to 2 Years Exp | Polytechnic Diploma |
| 4 | Store In-charge | 1 | 2 to 5 Years Exp | Bcom/Mcom |
| 5 | Helper | 12 | 0 to 1 Year | Any |

Factory Address-
Hitay Industries LLP
A3/3, Supa Parner Industrial Park, Additional Supa MIDC, Waghunde, Tal Parner.
Interview at
6" floor , Unity Gold Complex, Near Deccan Metro Station, Deccan Pune-04
Mobile- + 919028571579. Email: hr@hitayindustries.com

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

## चेहऱ्यावरील काळे डाग, टॅनिंगवर किचनमध्ये उपाय

**आज काल टॅनिंगची समस्या खूप सामान्य आहे. थोडावेळ उन्हात उभे राहिल्यास त्वचा काळी पडू लागते. म्हणूनच घराबाहेर पडताना शरीर पूर्णपणे झाकण्याचा सल्ला दिला जातो. सन क्रीम आणि टॅनिंग रिमूव्हर क्रीमचे अनेक मोठे ब्रँड बाजारात उपलब्ध आहेत. पण या गोष्टींची किंमत जास्त असल्याने सर्वांनाच या गोष्टी परवडतील असे नाही. अनेकजण हा फालतू खर्च समजूनही खरेदी करत नाहीत. अशा वेळी सन टॅन दूर करण्यासाठी आम्ही तुम्हाला असे उपाय सांगत आहोत, जे तुम्ही तुमच्या स्वयंपाकघरात ठेवलेल्या वस्तूंनीच करू शकता.**

- हळद आणि बेसन पॅक : हळद आणि बेसनाच्या पॅकने घरच्या घरी त्वचेची टॅनिंग सहज काढता येते. यासाठी अर्धा चमचा हळद, एक चमचा गुलाबपाणी आणि दूध दोन चमचे बेसन मिसळून



घ्या. आता टॅनिंग त्वचेला पाण्याने चांगले धुवा आणि पेस्ट लावा. १० मिनिटांनंतर त्वचा धुवून स्वच्छ करा. त्वचेचा रंग परत येईपर्यंत तुम्ही हा पॅक दर दुसऱ्या दिवशी लावू शकता.
- सन टॅन घालवण्यासाठी बटाट्याचा वापर : त्वचेवरील सन टॅन दूर करण्यासाठी बटाटा हा एक प्रभावी घरगुती उपाय मानला जातो. पण त्यात कॅटेकोलेज नावाचे एंजाइम असते, जे त्वचेचा रंग उजळण्यास मदत करते. त्याबद्दलचा सर्वात चांगला भाग म्हणजे तुम्हाला ते कशातही मिसळण्याची गरज नाही. टॅनिंग दूर करण्यासाठी, फक्त तीन कच्च्या बटाट्याची पेस्ट तयार करा आणि त्वचेवर लावा. तुम्ही अर्धा कापलेला बटाटा देखील वापरू शकता.
- दही आणि हळद मिसळा : हात, पाय, मान किंवा चेहऱ्यावरील त्वचेवरील डाग दूर करण्यासाठी तुम्ही दही आणि हळद यांचे मिश्रण लावू शकता. हे दह्यामध्ये असलेले प्रोबायोटिक्स आणि हळदीतील दाहक-विरोधी गुणधर्मांमुळे आहे, जे त्वचेची चमक वाढवते आणि मुक्त रॅडिकल्सपासून संरक्षण करते. ही पेस्ट बनवण्यासाठी तुम्हाला फक्त एक वाटी थंड दही आणि चिमूटभर हळद लागेल. आंघोळ करण्यापूर्वी ते त्वचेवर लावा आणि कमीतकमी २० मिनिटे सोडा. चांगल्या परिणामांसाठी ही पेस्ट किमान दोन आठवडे दररोज वापरा.
- कच्च्या दुधाने आराम मिळेल : टॅनिंग दूर करण्यासाठी कच्चे दूध खूप प्रभावी आहे. त्यात हळद आणि लिंबाचा रस घालून तुम्ही तुमचा नैसर्गिक टॅन रिमूव्हर तयार करू शकता. टॅन केलेल्या भागावर मसाज करा आणि पेस्ट सुकल्यानंतर धुवा. तुम्हाला दिसेल की त्वचेची चमक परत येत आहे.
- टोमॅटो टॅनिंग लवकर दूर करेल : टोमॅटो हे लाइकोपीन समृद्ध नैसर्गिक सनस्क्रीन आहे. हे अँटीऑक्सिडंट्ससह चॉक-ए-ब्लॉक आहे, जे मुक्त रॅडिकल्सच्या नुकसानाशी लढा देते. अशा परिस्थितीत, सूर्यप्रकाशित त्वचेच्या उपचारांसाठी हा एक उत्तम पर्याय आहे. बाहेरून घरी येताच ताबडतोब कापून काळ्या त्वचेवर लावा आणि २० मिनिटे तसेच राहू द्या.

## शॅम्पूनंतर केस आणखीनच गळतात ?

**केसांमुळे आपले व्यक्तीमत्व अधिक खुलते. आपले शरीर जितके निरोगी असेल तितके केससुद्धा छान राहतात. म्हणजेच केसांचे आरोग्य आपण किती पौष्टिक आहार घेतो यावर अवलंबून असते.**

केस गळू नयेत, मऊ आणि दाट राहावे यासाठी वेगवेगळे उपाय केले जातात. पण प्रत्येक वेळी त्यातून समाधान मिळतेच असे नाही. केसगळती या समस्येला सर्वजण त्रासलेले दिसून येतात. त्यातही शॅम्पूने केस धुतल्यानंतर केस अधिक गळतात, असा अनुभव काहीजणांना आला असेल. केसांची काळजी उत्तमरीत्या घेण्यासाठी प्रत्येक जण प्रयत्न करत असतो. केस जास्त गळायला लागले की सगळेच चिंताग्रस्त होतात. कारण आपण आकर्षक दिसावं असं प्रत्येकालाच वाटत असते. त्यामुळे यावर काय करता येईल यासाठी वेगवेगळे प्रोडक्ट वापरले जातात. त्यातच केस धुण्यासाठी महागड्या शॅम्पूची निवड केली जाते. पण शॅम्पूने केस धुतल्यानंतर कधी कधी केस जास्त गळतात. याचा अनुभव बऱ्याच जणांनी घेतला असेल. याबद्दल तज्ज्ञांचे काय मत आहे जाणून घेऊया. तज्ज्ञांच्या मते शॅम्पू लावल्यानंतर होणारी केसगळती थांबवण्यासाठी केसांना हानिकारक नसणारा, सल्फेट फ्री शॅम्पू वापरावा. जेणेकरून तुमचे केस आणि टाळू कोरडे होणार नाहीत. शॅम्पू लावताना टाळूवर खूप जोरात मसाज करू नये. त्यामुळे केस अधिक गळण्याची शक्यता असते. यावरील सोपा पर्याय म्हणजे पुरेसा शॅम्पू हातात घेऊन त्याचा फेस बनवा आणि तो हळूवारपणे टाळूवर लावा. टाळूवर जास्त जोर देऊन शॅम्पू लावू नका. केस धुण्यासाठी नेहमी थंड किंवा कोमट पाण्याचा वापर करा. केस धुताना गुंता होण्याची शक्यता असते. ज्यामुळे केस गळू शकतात. म्हणून केस हळुवारपणे बोटांच्या साहाय्याने धुवा. शॅम्पू लावण्याची ही पद्धत नक्कीच उपयुक्त ठरू शकते.

## शॅम्पू करण्याच्या ५ टिप्स...

**केसांची काळजी घेण्यासाठी योग्यप्रकारे काही गोष्टी पाळल्या पाहिजेत. कधी कधी केसांची काळजी घेण्याचा कंटाळा येतो. पण काही गोष्टी न चुकता केल्यास केस छान राहण्यास मदत होते. बहुतेक लोक आठवड्यातून एकदा तरी आपले केस धुतात, परंतु अनेकांना शॅम्पू नक्की कसा वापरायचा याचा योग्य मार्ग माहित नाही. तज्ज्ञ डॉक्टर सांगतात, केसांची काळजी घेण्याच्या दिनक्रमात शॅम्पूइंग ही सर्वात महत्वाची पायरी आहे, म्हणून काही तथ्ये जाणून घेणे आणि शॅम्पूइंग योग्य कसे करावे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.**

### पाच शॅम्पूइंग टिप्स

1 शॅम्पू फक्त टाळू स्वच्छ करण्यासाठी आहे : शॅम्पू फक्त टाळूसाठी आहे. उत्पादनाच्या तीव्रतेनुसार शॅम्पू ३० सेकंद किंवा त्यापेक्षा जास्त काळ एकट्या टाळूमध्ये मालिश केले पाहिजे. लक्षात ठेवा की समान वितरणासाठी आणि चांगले लॅथरिंगसाठी, आपले केस ओले असणे आवश्यक आहे.

2 शॅम्पू कमी प्रमाणात वापरला पाहिजे : आपण कमी प्रमाणात शॅम्पू न वापरल्यास केस जास्त कोरडे होऊ शकते. जास्त शॅम्पू लावल्याने तुमचे केस खराब होऊ शकतात. तुमचे केस कितीही लांब असले तरीही, अगदी थोडासा शॅम्पू लावावा.

3 शॅम्पूचा वापर किती वेळा करावा? : आपल्यापैकी बरेचजण आठवड्यातून एकदा किंवा दोनदा शॅम्पू लावतात. परंतु तुमच्या केसांच्या पोत आणि टाळूच्या स्वभावावर हे अवलंबून असते की शॅम्पूचा वापर किती वेळा करावा? काहींना दररोज शॅम्पू करण्याची आवश्यकता असू शकते आणि अशा परिस्थितीत सौम्य शॅम्पू वापरणे आवश्यक आहे. काहींना टाळूला नियमित शॅम्पू करण्याची आवश्यकता नसली तरी, पोत आणि वाढीसाठी वारंवारता कमी करणे महत्वाचे आहे. शॅम्पू करताना तुम्हाला काही समस्या येत असल्यास त्वचारोगतज्ज्ञांचा सल्ला घेणे तुम्हाला चांगले परिणाम मिळवण्यासाठी मदत करू शकते.

4 कोणताही शॅम्पू उत्तम नाही : जे दुसऱ्याला बरोबर वाटेल तोच शॅम्पू तुमच्यासाठी योग्य आहे असं असू शकत नाही. प्रत्येकाचे केस वेगळे असतात. आपल्या केसांना त्याच्या प्रकृतीनुसार शॅम्पू शोधणे आवश्यक आहे. त्वचारोगतज्ज्ञ तुमच्या टाळूची स्थिती आणि केसांच्या पोत याबाबत मार्गदर्शन करू शकतात. काहींचे कोरडे टाळू आणि काही तेलकट असू शकतात, म्हणून योग्य शॅम्पू निवडणे गरजेचे असते.

5 ओल्या केसांना टॉवेलने बांधू नका : एकदा आपण आपले केस धुतले की नीट सुकवलेही पाहिजे. आपले केस घट्ट टॉवेलने बांधल्याने त्याचं नुकसान होऊ शकते. आपले केस सुकवण्याचा एक उत्तम मार्ग म्हणजे कॉटन टॉवेल किंवा कॉटन टी-शर्ट वापरणे. त्याच्या मऊ पोतामुळे केसांचे कोणतेही नुकसान होणार नाही.





**केस लांबसडक आणि दाट असावेत असे प्रत्येक महिलेचे स्वप्न असते. पण जर केसांची वाढ थांबली असेल तर त्यावर उपाय काय हा प्रश्नसुद्धा प्रत्येक महिलेच्या मनात असतो. बाजारातील केमिकलयुक्त शॅम्पूंच्या वापरामुळे केस गळणे, राठ होणे आणि निर्जिव होण्याची समस्या वाढते. अशा परिस्थितीत घरच्या घरी नैसर्गिक घटकांपासून शॅम्पू तयार करून केसांचे आरोग्य सुधारले जाऊ शकते. आम्ही तुम्हाला राइस शॅम्पू बनवण्याची आणि त्याचा योग्य प्रकारे वापर करण्याची पद्धत सांगणार आहोत, ज्यामुळे तुमचे केस लांब, दाट आणि चमकदार होतील. आपण वापरत असलेल्या रासायनिक शॅम्पूमध्ये सोडियम लॉरील सल्फेट आणि पॅराबेन्ससारखे हानिकारक घटक असतात. जे आपल्या केसांना हानी पोहोचवतात यात शंका नाही. याशिवाय, यामुळे केस गळणे आणि अकाली पांढरे होण्याची समस्यादेखील वाढते. त्यामुळे असा शॅम्पू घरीच बनवणे महत्त्वाचे आहे, ज्याचा वापर केल्यावर एकही केस तुटत नाही आणि वाढही जलद होते. चला जाणून घेऊया असा प्रभावी शॅम्पू कसा बनवायचा...**

## तांदळाच्या शॅम्पूमुळे भराभरा वाढतील केस

### राइस शॅम्पू तयार करण्यासाठी साहित्य

- तांदूळ १ कप, मेथी २ चमचे, रिठा शिककाई १ कप, पाणी ४ ग्लास, फ्लॅक्स सीड्स (जवस) २ चमचे.
- राइस शॅम्पू बनवण्याची प्रक्रिया : एका भांड्यात १ कप रीठा, २ चमचे मेथी दाणे, २ चमचे फ्लॅक्स सीड्स आणि २ ग्लास पाणी घालून संपूर्ण रात्री भिजवून ठेवा. अगदी सकाळी भिजवलेले तांदूळ मिक्सरमध्ये बारीक करून, पाणी वेगळे काढा. एका पॅनमध्ये तांदळाचे पाणी, रीठा, मेथी आणि फ्लॅक्स सीड्स एकत्र घालून १५-२० मिनिटे उकळा. उकळल्यानंतर, मिश्रणातील ठोस घटक मिक्सरमध्ये बारीक करून पेस्ट बनवा. यातील रीठ्याची बीजे काढून टाकायला विसरू नका. एका स्वच्छ सुती कपड्याने तयार केलेले पेस्ट गाळा आणि त्यात तांदळाच्या पाण्याचे मिश्रण नीट मिसळा. अशा प्रकारे तुमचा नैसर्गिक राइस शॅम्पू तयार होईल.

### राइस शॅम्पूचे फायदे

- केसांची वाढ सुधारते : राइस शॅम्पूमध्ये असलेल्या नैसर्गिक घटकांमुळे केस लवकर वाढतात आणि दाट होतात.
- केस गळती रोखली जाते : रिठा आणि मेथीच्या गुणधर्मांमुळे केसांचा तुटण्याचा आणि गळण्याचा त्रास कमी होतो.
- केसांचे पोषण : फ्लॅक्स सीड्स आणि तांदळाचे पाणी केसांना नैसर्गिक पोषण देतात, ज्यामुळे ते मऊ, चमकदार, आणि सशक्त होतात.
- डॅमेज केस दुरुस्त होतात : डॅमेज झालेल्या केसांना हा शॅम्पू योग्य प्रकारे दुरुस्त करून त्यांचे आरोग्य सुधारतो.
- केमिकल मुक्त समाधान : यात कोणतेही हानिकारक केमिकल्स नसल्यामुळे केसांचे दीर्घकालीन आरोग्य टिकून राहते.

### राइस शॅम्पू वापरण्याचे महत्त्वाचे मुद्दे

बऱ्याच लोकांना जास्त फेस असलेले शॅम्पू वापरणे आवडते. त्यामुळे जास्त फेस निर्माण करण्यासाठी रिठ्याचे प्रमाण वाढवता येईल. शॅम्पू केल्यानंतर तांदळाच्या पाण्याने केस स्वच्छ धुतल्यास फ्रीझीनेस कमी होतो. शॅम्पू लवकर खराब होऊ नये म्हणून तो फ्रिजमध्ये ठेवावा.

घरी बनवलेला राइस शॅम्पू हा केमिकलयुक्त शॅम्पूंच्या तुलनेत अधिक फायदेशीर आणि सुरक्षित आहे. याचा नियमित वापर केल्यास केस दाट, लांबसडक, आणि चमकदार बनतील. नैसर्गिक घटकांपासून बनवलेला हा उपाय तुमच्या केसांच्या आरोग्यासाठी प्रभावी ठरेल.



## शॅम्पू करूनही केस तेलकट होतात ?

**जेव्हा केस चिकट आणि तेलकट असतात, तेव्हा ते तुटण्याची शक्यता देखील वाढते. केस लवकर तेलकट होण्याचे कारण म्हणजे आपल्या टाळूवर होणारं ऑइल प्रोडक्शन. यामुळे केस चिकटलेले दिसतात आणि स्पर्श केल्यावर चिकट वाटतात. अशा परिस्थितीत केस रोज धुणे हा उपाय नाही. कारण जास्त शॅम्पू केल्याने केस कमकुवत आणि कोरडे होतात. केसांना तेलकट होण्यापासून रोखण्यासाठी काही घरगुती टिप्स तुमच्या उपयोगाचे ठरू शकतात...**

- ॲपल सायडर व्हिनेगर : जर तुमच्या टाळूवर जास्त तेल जमा होत असेल तर ते थांबवण्यासाठी ॲपल सायडर व्हिनेगर खूप प्रभावी ठरतं. यामध्ये असलेले ॲसिटिक ॲसिड स्कॅल्पची पीएच पातळी संतुलित करते. ज्यामुळे केस लवकर तेलकट होत नाहीत. तुम्ही एक कप पाण्यात दोन ते तीन चमचे ॲपल सायडर व्हिनेगर मिसळा आणि शॅम्पू केल्यानंतर केसांना लावा. साधारण अर्ध्या तासानंतर केस स्वच्छ पाण्याने धुवा. आठवड्यातून दोनदा असे केल्याने तेलकट केसांची समस्या दूर होते.
- मुलतानी माती : मुलतानी माती लावल्याने आपल्या डोक्यातील रक्ताभिसरण योग्य प्रकारे होते. ज्यामुळे केसही मजबूत होतात. मुलतानी मातीमध्ये असलेले गुणधर्म देखील टाळूचे पीएच संतुलन सुधारतात. ज्यामुळे केस तेलकट आणि चिकट होत नाहीत. यासाठी तुम्ही तीन चमचे मुलतानी माती थोड्या प्रमाणात पाण्यात घेऊन त्याची हलकी जाड पेस्ट बनवा. आता ही पेस्ट केसांच्या मुळांवर लावा आणि सुमारे २० मिनिटे राहू द्या. केस धुण्यासाठी कोमट पाण्याचा वापर करा. आठवड्यातून एकदा हा उपाय करा.
- पुदिन्याची पाने : आपल्या टाळूमध्ये तेल जमा होण्यापासून रोखण्यासाठी पुदिना प्रभावी असल्याचे मानले जाते. यासाठी तुम्ही दोन ग्लास पाण्यात सुमारे २० पुदिन्याची पाने टाका आणि २० मिनिटे उकळा. त्यानंतर त्या पाण्यात शॅम्पू मिसळा आणि त्या पाण्याने केस धुवा.
- कंडिशनरचाही होतो फायदा : केस लवकर तेलकट होत असतील तर यासाठी केसांमध्ये कंडिशनर वापरायला विसरू नका. प्रत्येक वेळी शॅम्पू करताना केसांना कंडिशनर वापरा. यामुळे केस तुटत नाही आणि त्यांना चमक देते. केस लवकर तेलकट होत नाहीत.

## हेअरफॉल रोखणारा नैसर्गिक शॅम्पू

**केस गळती ही अशी समस्या आहे जी सर्वसाधारणपणे प्रत्येक वयोगटातील लोकांना भेडसावते. बाजारात उपलब्ध असलेल्या अनेक रासायनिक शॅम्पूंपेक्षा नैसर्गिक आणि घरगुती उपाय अधिक सुरक्षित आणि प्रभावी असतात. नैसर्गिक घटकांचा वापर करून तयार केलेले शॅम्पू केसांच्या मुळांना मजबूती देऊन केसांची गुणवत्ता सुधारतात. आज आम्ही तुम्हाला अशाच एका हेअरफॉल रोखणाऱ्या शॅम्पूबद्दल सांगणार आहोत. जो तुम्ही घरच्या घरी बनवू शकता. कांदा, तांदूळ, लवंगा, तमालपत्र आणि पाणी या पाच घटकांचा उपयोग करून तयार केलेला हा शॅम्पू केस गळती विरोधी गुणधर्म असणारा आहे. या शॅम्पूची तयारी कशी करावी, कसा वापरावा आणि त्याचे फायदे काय आहेत हे जाणून घेऊया...**

### शॅम्पू तयार करण्याची पद्धत

कांदा, तांदूळ, लवंगा, तमालपत्र आणि पाणी वापरून शॅम्पू तयार करण्याची प्रक्रिया सोपी आहे. त्यासाठी एका मोठ्या भांड्यात पाणी घेऊन त्यात एक मोठा कांदा चिरून टाका. आता तांदूळ, लवंग आणि तमालपत्र घालून सुमारे दहा मिनिटे हे मिश्रण शिजवा. दहा मिनिटे हे मिश्रण झाकून थंड होऊ द्यावे. यामुळे होईल काय तर कांदा, लवंग, तमालपत्र हे सर्व घटक पाण्यात विरघळतील. आता हे पाणी गाळून घ्या. नंतर मिश्रणात एक चमचा कॉफी पावडर घाला. चांगले मिक्स करा आणि बेबी शॅम्पूमध्ये मिक्स करा. आता आठवड्यातून दोन दिवस या खास शॅम्पूने केस धुवा.

### शॅम्पू कसा लावायचा ?

शॅम्पू लावण्यापूर्वी केस ओले करा. हाताने किंवा ब्रशने शॅम्पू थोडासा घ्या आणि केसांच्या मुळांपासून टोकापर्यंत लावा. हलक्या हाताने केसांना मसाज करा. जेणेकरून शॅम्पू त्वचेवर आणि केसांवर समान रीतीने लागेल. साधारण ५-१० मिनिटे मसाज केल्यानंतर केस स्वच्छ पाण्याने धुवा. या शॅम्पूचा वापर आठवड्यातून दोनदा करा. नियमित वापराने तुम्हाला त्याचे फायदे लवकरच दिसू लागतील.

- कांद्याचे फायदे : कांद्यात सल्फर असते, जे केसांच्या वाढीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. सल्फर केसांच्या मुळांना पोषण देऊन त्यांची मजबूती वाढवते. कांद्याचा रस केसांच्या त्वचेत रक्ताभिसरण वाढवतो. ज्यामुळे केसांची मुळे मजबूत होतात. तसेच, कांद्याचा रस अँटीबॅक्टेरियल आणि अँटीफंगल गुणधर्म असतो. ज्यामुळे केसांच्या त्वचेवरील संसर्ग कमी होतो. त्यामुळे केस गळती रोखण्यासाठी कांद्याचा वापर उपयुक्त ठरतो.



- तांदुळाचे फायदे : तांदुळाच्या पाण्यात इनोसिटोल नावाचे घटक असतात, जे केसांच्या नुकसानग्रस्त भागांची दुरुस्ती करतात. तांदुळाचे पाणी केसांच्या चमक वाढवते आणि त्यांना मऊ बनवते. तांदुळाचे पाणी केसांच्या मुळांना पोषण देते आणि त्यांना मजबूत बनवते. नियमित वापर केल्यास केस गळती कमी होते आणि केसांची गुणवत्ता सुधारते. तांदुळाच्या पाण्यातील नैसर्गिक गुणधर्म केसांची मुळे मजबूत करण्यास मदत करतात.
- लवंग आणि तमालपत्राचे फायदे : लवंगा आणि तमालपत्रामध्ये अँटीऑक्सिडंट्स असतात, जे केसांच्या मुळांना संरक्षण देतात. लवंगांमध्ये यूजेनॉल नावाचे तेल असते, जे केसांच्या वाढीसाठी उपयुक्त आहे. तमालपत्रामध्ये अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असतात, जे केसांच्या त्वचेवर होणारे संक्रमण रोखतात. यामुळे केसांची मुळे मजबूत होतात आणि केस गळती कमी होते. लवंग आणि तमालपत्राचा नियमित वापर केल्यास केसांची गुणवत्ता सुधारते.

## शॉर्ट न्यूज

### श्रीरामपूर बसस्थानक अद्ययावत करा

**श्रीरामपूर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर शहर हे पश्चिम महाराष्ट्रातील एक महत्वाचे व्यापारी आणि औद्योगिक केंद्र मानले जाते. १९६४-६५ साली बांधण्यात आलेले येथील बसस्थानक आज अत्यंत जीर्णावस्थेत आहे. प्रवाशांना मूलभूत सोयीसुविधांचा अभाव भासत आहे. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र कृषक समाजाच्या अध्यक्षा व शिर्डी साईबाबा संस्थानच्या विश्वस्त अनुराधा गोविंदराव आदिक यांनी बसस्थानकाच्या अद्ययावतीकरणाची मागणी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे केली आहे.

### प्रयागराजच्या नागरिकांची केली लाखोंची लूट

**श्रीगोंदा :** तालुक्यात स्वस्तात सोने देण्याचे आमिष दाखवून परराज्यातील नागरिकांना लुटणारी टोळी पुन्हा सक्रिय झाल्याची चर्चा जोर धरू लागली आहे. विशेषत: प्रयागराज येथील काही नागरिकांना लक्ष्य करून त्यांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याच्या बातम्या स्थानिक पातळीवर पसरत आहेत. मात्र, या प्रकरणी अद्याप श्रीगोंदा पोलिस ठाण्यात कोणतीही अधिकृत तक्रार नोंदवली गेली नसल्याने गुन्हा दाखल होणार की प्रकरण दडपले जाणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### वीट व्यवसायाला विमा योजना

**संगमनेर :** कुंभार समाजाच्या वीट व्यवसायास प्रदूषणाची अट सरकारने रद्द केली आहे. त्याचप्रमाणे पुढील काळात बिगरशेतीची अट रद्द करून अवकाळी पावसाने वीट व्यवसायाचे नुकसान झाल्यास विमा योजना लागू करण्यासाठी आपण शासन दरबारी पाठपुरावा करणार असल्याचा विश्वास आमदार अमोल खताळ यांनी कुंभार समाज बांधवांना दिला. कुंभार गल्लीतील गोरोबा काका मंदिरात आ. खताळ यांच्या हस्ते महाआरती करून अभिवादन करण्यात आले. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

### वनरक्षकाला जातीवाचक शिवीगाळ

**पाथर्डी :** तालुक्यातील एकनाथवाडी येथे राखीव वनक्षेत्रात शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करून एका वनरक्षकाला जातीवाचक शिवीगाळ केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी पाथर्डी पोलीस ठाण्यात बळीराम आश्रुबा डोंगरे याच्यावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वनरक्षक विशाल माधव बनसोडे (वय २९, रा. ब्रम्हपुरी, ता. अहमदपूर, जि. लातूर, सध्या रा. खरवंडी, ता. पाथर्डी) यांनी दिलेल्या फिर्यादी दिली आहे.

### कोल्हार उपबाजारात गहू २६२५ रुपये क्विंटल

**राहाता :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कोल्हार बुद्रुक येथील उपबाजारात गव्हाची ३३ क्विंटल आवक झाली. गहू कमीत कमी २५०० रुपये तर जास्तीत जास्त २६२५ रुपये प्रती क्विंटल दराने खरेदी करण्यात आला. तसेच कोल्हार उपबाजारात हरभऱ्याची ५ क्विंटल आवक झाली. हरभरा सरासरी ५५०० रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करण्यात आल्याची माहिती बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर व सचिव सुभाष मोटे यांनी दिली.



# अक्षय तृतीया

हिंदू धर्मातील अत्यंत शुभ सण असून हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्याने याला शुभ दिन मानतात. यादिवशी काही वस्तू खरेदी करणे अत्यंत भरभराटीचे लक्षण मानले जाते. देवी लक्ष्मी आणि विष्णूजींची पूजा केल्याने त्यांची कृपा यादिवशी मिळते आणि घरात सुखशांती येते समृद्धी मिळते असे मानतात. अक्षय तृतीयेच्या दिवशी पूजा कशी करावी, अक्षय तृतीयेचे महत्व काय आहे जाणून घेऊयात या सणाची माहिती.

**पौराणिक कथा**

धार्मिक पौराणिक कथेनुसार भगवान श्रीकृष्णांनी पांडवांना अक्षय पात्र भेट दिले होते. यामुळे त्यांना आपल्या प्रवासात उपाशी राहावे लागले नाही. कारण अक्षय या शब्दाचा अर्थच आहे अविनाशी म्हणजेच कधीही न संपणारा. यामुळे हा दिवस पवित्र मानतात कारण यादिवशी खरेदी केलेली वस्तू शुभ परिणाम देते, आयुष्यात भरभराटी घेऊन येते.

**काय खरेदी करावे ?**

अक्षय तृतीया साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्याने यादिवशी शुभकार्य केली जातात. तसेच नवीन वस्तू देखील घेतात. अक्षयतृतीयेला सोने आणि चांदी घेणे अत्यंत शुभ मानले जाते. तसेच यादिवशी वास्तू खरेदी करणे सुद्धा शुभ मानतात. गृहप्रवेश केला जातो, वास्तुशांती देखील घातली जाते. नवीन गाडी अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर अनेकजण घेतात.

**दानाचे महत्व**

अक्षय तृतीयेच्या दिवशी दान करण्याला अत्यंत महत्व आहे. यादिवशी गोर गरिबांना अन्नदान करणे शुभ मानतात. तसेच पक्षांना धान्य टाकणे, गरजुंना आवश्यक वस्तू दान करणे महत्वाचे मानले जाते. यादिवशी तुम्ही कोणत्याही स्वरूपाचे दान करू शकता.

**पूजा विधी**

अक्षय तृतीयेच्या दिवशी देवी लक्ष्मी आणि विष्णूजींची पूजा करण्याची मान्यता आहे. देवी लक्ष्मीला आपण धनसंपत्तीचे प्रतीक मानतो. असे म्हणतात यादिवशी देवीची पूजा केल्याने तिची कृपा प्राप्त होऊन घरात धनसंपत्ती, समृद्धी येते. दिवाबत्ती, धूप हार फुले वाहून देवीची आराधना करावी. काहीजण कलश मांडून देखील पूजा करतात. तसेच घरात गोडाचा नैवेद्य करून तो देवाला अर्पण करावा.

**खरेदीसाठी शुभ वस्तू**

सोने चांदीची खरेदी

अक्षय तृतीया म्हंटल की डोळ्यासमोर लगेच सोन्या चांदीची दुकाने येतात. यादिवशी लोकं आवर्जून सोन चांदी खरेदी करतात. कारण अक्षय तृतीयेला सोने आणि चांदी खरेदी करणे अत्यंत शुभ मानले जाते. या धातूंना समृद्धी आणि लक्ष्मीचे प्रतीक मानल्याने घरात धनसंपत्तीची वाढ होते असे म्हणतात.

**गाडी खरेदी**

अक्षय तृतीयेला गाड्यांच्या शोरूम बाहेर खरेदीसाठी गर्दी झालेली पहायला मिळते. कारण या दिवशी नवीन गाडी खरेदी करणे अत्यंत शुभ मानले जाते. वाहन खरेदी करताना मुहूर्त पाहून घ्यावे असे म्हणतात. आणि अक्षय तृतीया साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्याने या दिवशी गाडी खरेदी करणे शुभ मानले जाते.

**घर खरेदी**

अक्षय तृतीयेच्या दिवशी अनेकांच्या घराची पूजा, वास्तुशांती असल्याचे पहायला मिळते. यादिवशी अनेकजण घर खरेदी देखील करतात. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला हा सण सुख समृद्धी घेऊन येत असल्याने यादिवशी खरेदी केलेली वास्तू कायम भरभराटी देते असे मानतात. तसेच वास्तुशांती करून यादिवशी घरात प्रवेश करणे देखील शुभ मानतात कारण घरात सकारात्मक ऊर्जा येते आणि समृद्धी वाढते.

**तांब्याची व पितळेची भांडी**

घरात अन्नपूर्णा देवी भरभराट देते असे म्हणतात. त्यामुळे अक्षय तृतीयेला तांब्याची किंवा पितळेची भांडी खरेदी करणे शुभ मानले जाते. यामुळे घरात कायम अन्नधान्याची भरभराट होते.

**कवड्या**

अक्षय तृतीयेला देवी लक्ष्मीची कृपा मिळवण्यासाठी तिची पूजा करतात. हा दिवस देवी लक्ष्मीला समर्पित केला जातो. आपण धनसंपत्तीची देवता म्हणून देवी लक्ष्मीकडे पाहतो. आर्थिक अडचणी देवी लक्ष्मीच्या कृपेने दूर होतात असे मानले जाते. त्यामुळे यादिवशी कवड्या खरेदी करून लक्ष्मीला अर्पण करणे शुभ मानले जाते. यामुळे लक्ष्मी प्रसन्न होते आणि घरात सुख-समृद्धी येते.

**मातीची भांडी**

मातीला आपण धरणी माय असे म्हणतो. माता म्हणून तिची पूजा करतो. अक्षयतृतीयेच्या शुभ मुहूर्तावर मातीची भांडी घेणे शुभ मानतात कारण मातीची भांडी, विशेषत: धान्य आणि डाळी साठवण्यासाठी वापरली जाणारी भांडी संपत्ती आणि समृद्धी प्रदान करतात अशी धार्मिक मान्यता आहे. त्यामुळे यादिवशी मातीची भांडी खरेदी करावी.

**वाचकांच्या लेखणीतून**

# दोन फक्कड संत

समस्त भारतात दोन फक्कड संत होऊन गेले. उत्तर भारतात संत कबीर (१५ व्या शतकाचा मध्य) आणि महाराष्ट्रात संत तुकाराम (१७ वे शतक). दोघांच्या भक्तिशास्त्राची बैठक अलग होती. संत कबीर निर्गुण उपासक होते तर संत तुकाराम सगुण उपासक होते.

संत कबीर म्हणतात,
पाथर पूजे हरि मिले, तो मैं पूजूं पहार।
याते चाकी भली जाको पीस खाए संसार।।

संत कबीर सगुण भक्ती नाकारतात. निर्गुण भक्तीची तरफदारी करताना म्हणतात, दगडाला पुजल्याने देव भेटला असता तर मी पहाडच पुजला असता. त्यापेक्षा जाते बरे. ते जगाला अन्न तरी देते!

संत तुकाराम सगुण भक्तीचा डांगोरा पिटताना, विठ्ठलाच्या मूर्तीची आराधना करताना म्हणतात,
सुंदर ते ध्यान उभे विटेवरी।
कर कटावरी ठेवोनिया।।

संत कबीर आपले विचार मांडताना स्पष्टपणे म्हणतात,
बड़ा हुआ तो क्या हुआ, जैसे पेड़ खजूर।
पंथी को छाया नहीं, फल लागे अति दूर।।

मोठा झाला म्हणून काय झाले? तो तर खजुराच्या झाडासारखा! पक्ष्याला सावली लाभत नाही आणि फळेही अगदी उंचावर! काय लाभ?

तसेच
बुरा जो देखन मैं चला, बुरा न मिलिया कोय।
जो दिल खोजा अपना, मुझसे बुरा न कोय।।

जगात दुर्जन मनुष्य शोधू लागलो तर कोणीच दुर्जन मनुष्य सापडला नाही. माझ्या अंत:करणात शोधून पाहिले तर माझ्यासारखा दुर्जन मीच! असे आढळले.

संत तुकारामही म्हणतात,
जववरी रे तववरी वैराग्याच्या गोष्टी।



जववरी तुका भेटी झाली नाही।।
एके ठिकाणी संत तुकाराम संत कबीरांप्रमाणेच म्हणतात,
कासया गुणदोष पाहू अनेकांचे।
मज काय त्यांचे उणे असे।।
किंवा
तुका म्हणे ऐशा नरा।
मोजुनी माराव्या पैजारा।।

हे दोन्हीही संत सडेतोड विचार मांडतात. कुणाचीही भीडभाड ठेवीत नाहीत. कवी केशवसुतांनी म्हटलेच आहे,
कठीण शब्द या धोंड्यांनी करतो हाणाहाण
कठीण शब्दही वापरण्यास वेळप्रसंगी ही मंडळी मागे राहत नाहीत. कारण संत तुकारामच म्हणत नाहीत का?
बुडती हे जन न देखवे डोळा।
म्हणुनी कळवळा येत असे।।

चुकत असलेल्या समाजाला कठीण शब्दांचा मारा करीत, कसलीही भीडभाड न ठेवता, वेळप्रसंगी स्वत:वर टीका करण्यासही ही मंडळी मागेपुढे पाहत नाहीत. म्हणूनच मी या दोघांना फक्कड संत म्हणतो.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

# गणेगाव दुमाला भागात रानगव्यांच्या जोडीचे दर्शन !

**बिबट्या पाठोपाठ नागरिकांमध्ये आता गव्यांचीही दहशत**
**तरुणांकडून गव्यांची जोडी मोबाईलमध्ये कैद**



**शिरुर : सतीश डोंगरे**

**शिरुर तालुक्याच्या पूर्व भागातील गणेगांव दुमाला गावच्या परिसरात नागरिकांना दोन रानगव्यांचे दर्शन झाले असून हे महाकाय रानगवे पाहून नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. आधीच या भागात बिबट्याची दहशत आहे त्यात आता रानगवे दिसल्याने नागरीकांच्या दहशतीत आणखी भर पडली आहे.**

गणेगांव दुमाला गावच्या शिवारात रविवारी रस्ता ओलांडताना दोन महाकाय गव्यांच्या जोडीचे दर्शन नागरिकांना झाले. या भागात प्रथमच गव्यांचे दर्शन झाल्याने काही उत्साही तरुणांनी यावेळी या गव्यांना व्हिडीओद्वारे आपल्या मोबाईलमध्ये कैद केले. त्यानंतर मोठ्या प्रमाणात व्हिडीओ व्हायरल झाल्याने या भागात नागरिकांमध्ये घबराट पसरली. पूर्ण वाढ झालेल्या या गव्यांचे अंदाजे वजन ७०० किलोंच्या आसपास असावे, असे स्थानिकांनी सांगितले.

मागील आठवड्यातही या भागात रानगवे दिसल्याची नागरिकांमध्ये चर्चा होती. मात्र रविवारी (दि.२७) प्रत्यक्ष रानगवे मोबाईलमध्ये कैद झाल्याने नागरिकांना खात्री झाली आहे. काही दिवसांपासून जंगल सोडून वन्यपशू मानवी वस्तीकडे का फिरकताहेत याचा विचार होणे गरजेचे आहे.

साधारण उन्हाळ्यात पाण्याच्या शोधार्थ हे वन्यजीव स्थलांतरित होत असतात, त्यातून कळप सोडून हे दोन रानगवे वाट चुकलेले असावेत, स्थानिकांना गवा दिसल्यास त्याला डिवचू नये, नागरिकांनी शक्यतो समूहाने कामासाठी बाहेर पडावे, आतापर्यंत या गव्याकडून कुठल्याही प्रकारचा उपद्रव झालेला नाही, असे वनखात्याकडून सांगण्यात आले. दरम्यान ही रानगव्यांची जोडी नेमकी कोठून व कोणत्या मार्गाने या भागात आली याचा वनविभाग शोध घेत आहे.

(पान १ वरून)

## प्रियकराच्या मदतीने पत्नीकडून पतीची हत्या

हिला पोलिसांनी १३ एप्रिल रोजी संशयावरून ताब्यात घेतले होते. यासंदर्भात माहिती अशी की ,मृत बाबाजी गायखे गेल्या काही वर्षांपासून पत्नी व दोन मुलींसह निघोज येथे रहात होता.तेथे तो डी.बी.लाळगे कन्स्ट्रक्शन कंपनीत चालक म्हणून काम करीत होता. घटनेच्या दिवशी,१२ एप्रिल रोजी रात्री दहा ते साडेदहा वाजेच्या दरम्यान गायखे पती पत्नीमध्ये झालेल्या वादाच्या वेळी जनकभाई तेथे उपस्थित होता.यावेळी झालेल्या झटापटीत बाबाजी घरातील कॉटवर पडला.त्याचवेळी प्रियकर जनकभाईने लोखंडी रॉडने बाबाजीच्या डोक्यावर जोरदार फटका मारला.या फटक्याने बाबाजीचा जागीच मृत्यू झाला. बाबाजीचा मृत्यू झाल्याचे लक्षात आल्यावर जनकभाई व सुप्रियाने बाबाजीचे तोंड प्लॅस्टिकच्या गोणीने झाकले.मृतदेह गोधडीत गुंडाळला.बाबाजीची दुचाकी व मृतदेह जनकभाईच्या छोटा हत्ती वाहनातून नेऊन निघोज-पाबळ (शिरूर ) रस्त्यावर पाबळ शिवारात निर्जन ठिकाणी टाकून दिला.दुचाकीही तेथेच टाकून अपघाताचा बनाव रचण्यात आला.

दरम्यान १३ एप्रिल रोजी सकाळी अज्ञात व्यक्तीचा मृतदेह पाबळ रस्त्यावर आढळून आल्याने पोलिसांनी सुरूवातीला अकस्मात मृत्यूची नोंद केली.पोलिस तपासात मृतदेह बाबाजी गायखेचा असल्याचे निष्पन्न झाले. शवविच्छेदनात जड वस्तूच्या माराने मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले.त्यानंतर हा अपघात नसून खून असल्याने त्यादिशेने पोलिसांनी बाबाजीची पत्नी सुप्रियाकडे कसून चौकशी केली.पोलिसांच्या प्रश्नांच्या भडिमारासमोर सुप्रिया फार वेळ उडवाउडवीची उत्तरे देऊ शकली नाही. तीने खुनाची कबुली देत संपूर्ण घटनाक्रम उलगडा. बाबाजीचा खून झाल्याचे निष्पन्न झाल्यावर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली.प्रियकर जनकभाईला ताब्यात घेण्यासाठी पोलिस पथक गुजरातला रवाना झाले. पथका पोलिस उपनिरीक्षक रणजित मारग, पोलीस नाईक गहिनीनाथ यादव, पो.कॉ. गोवर्धन जेवरे यांचा समावेश होता.तेथे आठ दिवस केलेल्या प्रयत्नांतर जनकभाई पोलिसांच्या जाळ्यात सापडला.

सहायक पोलीस निरीक्षक नितीन खंडागळे,पो.हे.कॉ. जालिंदर लोंढे, विवेक दळवी,सागर धुमाळ,मयुर तोडमल, पो.कॉ. कैतके यांनी केलेल्या तपासातून खुनाच्या गुन्ह्याची अवघ्या चोवीस तासात उकल झाली.

**जनकभाई वणी, सापुतारा मार्गे गुजरातमध्ये**

मृतदेह रस्त्याच्या कडेला टाकल्यावर जनकभाई त्याच्य छोटा हत्ती वाहनातून,अळकुटी- वडनेर बुद्रुक मार्गाने अहिल्यानगर - पुणे रस्त्यावरून पुणे येथे गेला तेथून तो नाशिकला पोहचला.त्यानंतर त्याने वणी, सापुतारा मार्गे गुजरात गाठले.

## दत्तात्रय रोकडे खविसचे चेअरमन प्रसाद शितोळे यांची व्हाईस चेअरमनपदी वर्णी

सकाळी ११ वाजता सहाय्यक निबंधक कार्यालयात संचालक मंडळाच्या विशेष सभेस सुरूवात झाल्यानंतर चेअरमनपदासाठी दत्तात्रय रोकडे तर व्हाईस चेअरमनपदासाठी प्रसाद शितोळे यांनी अर्ज दाखल केले. अर्ज दाखल करण्याच्या मुदतीमध्ये प्रत्येकी एकच अर्ज दाखल झाल्याने दोन्ही पदाधिकाऱ्यांच्या बिनविरोध निवडी झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी जाधव यांनी जाहिर केले. मा. खा. डॉ. सुजय विखे यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार काशिनाथ दाते, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील तसेच भाजपाच्या राज्य कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे यांनी विचार विनिमय करून चेअरमन, व्हाईस चेअरमनसाठी नावे निश्चित केली. निवडीनंतर दोन्ही पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील, लाडकी बहिण योजनेचे तालुकाध्यक्ष सुनील थोरात, दत्ता पवार, भाजपा युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष पंकज कारखिले, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष दुधाडे, शिवाजी रोकडे, दादाभाऊ वारे, सरपंच लहू भालेकर, रेखा मते, ज्योती ठुबे, सतीश पिंपरकर, संग्राम पावडे, मधुकर पठाडे, बाबासाहेब खिलारी, गंगाधर रोहोकले, प्रमोद कावरे, भाऊसाहेब मेचे, शैलेंद्र औटी, भरत गट, सिताराम देठे, लहू रावडे, संदीप ठुबे, अनिल दिवटे, कारभारी गायकवाड, संजय मते, संतोष आवारी, शशिकांत कारखिले, बाजीराव अलभर आदी.उपस्थित होते.

बिनविरोध निवडीचा मार्ग सुकर ॲड. खिलारी व रोहोकले यांनी राजीनामा दिल्यानंतर दोन्ही पदांसाठी संचालक मंडळामध्ये मोठी स्पर्धा निर्माण झाली होती. अनेकांनी आपआपल्या नेत्याकडे संधी मिळण्याबाबात साकडे घातले होते. त्यामुळे चेअरमन, व्हाईस चेअरमनपदाची माळ कोणाच्या गळयात पडणार ? याबाबत चर्चांना उधाण आले होते. वरिष्ठ नेत्यांनी सर्वांना विश्वासात घेत बिनविरोध निवडीचा मार्ग सुकर केला.

पूर्वाश्रमीचे वैभव प्राप्त करा

भाजपा, राष्ट्रवादी अजित पवार गट व शिवसेना शिंदे गटाचे खरेदी विक्री संघावर वर्चस्व आहे. वरिष्ठांच्या आदेशानंतर दोन्ही पदाधिकाऱ्यांच्या निवडीसाठी सर्व संचालकांनी होकार दिला. एकेकाळी आशिया खंडात पहिल्या क्रमांकावर असलेल्या या संस्थेची सध्याची स्थिती बिकट आहे. नवे पदाधिकारी संचालक मंडळाच्या साथीने संस्थेला पुर्वाश्रमीचे वैभव प्राप्त करून देण्यासाठी परीश्रम घेतील अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

**आझाद ठुबेसह २१ आरोपींना नाशिकला हलविले**

न्यायालयाने पारनेर पोलीस प्रशसनाकडे त्यासंदर्भात विचारणा केली होती.

न्यायालयाच्या विचारणेनंतर पारनेर पोलीसांनी न्यायालयास सुमारे २०० ते २५० पानांचा अहवाल सादर केला. सध्या उन्हाळयामुळे पारनेर शहरात पाण्याची तिव्र टंचाई आहे. शहराच्या काही भागांना १२ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. त्यामुळे पोलीस प्रशासन आरोपींना पुरेसे पाणी देण्यास असमर्थ असल्याने या आरोपींना नाशिक येथील कारागृहात हालविण्याचा अभिप्राय देण्यात आला होता. त्यानुसार या आरोपींना नाशिक येथे हालविण्यात आले आहे.



# पहेलगाम हल्ल्याचा मुस्लिम समाजाच्या वतीने निषेध

## तहसिलदार, पोलीस निरीक्षकांना निवेदन । आतंकवाद्यांना फासावर लटकवा



■ पहेलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याचा निषेध करून मुस्लिम समाजाच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले.

**पारनेर : प्रतिनिधी**

**काश्मीरमधील पहेलगाम येथे २८ निष्पाप पर्यटकांवर हल्ला करून त्यांना ठार मारण्यात आल्याच्या घटनेचा पारनेर तालुक्यातील मुस्लिम समाजाच्या वतीने निषेध करण्यात आला. तसे निवेदन तहसिलदार व पोलीस निरीक्षक यांना सादर करण्यात आले.**

पहेलगाम हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या पर्यटकांना श्रध्दांजली अर्पण करत असल्याचे नमुद करून हे हत्याकांड घडवून आणणारे आतंकवादी आणि त्यांना समर्थन देणारे पाकिस्तानी शासनकर्ते यांचा आम्ही जाहीर निषेध करतो असे या निवेदनात नमुद करण्यात आले आहे. हा हल्ला करणाऱ्या आतंकवाद्यांचा कसोशीने शोध घेऊन त्यांना जाहिरपणे फासावर लटकवा अशी आमची भारत सरकारकडे मागणी आहे. मृत्यूमुखी पडलेल्या पर्यटकांच्या परिवाराच्या दुःखात आम्ही मुस्लिम बांधव सहभागी असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

### दहशतवादाला थारा नाही

**इस्लाममध्ये दहशतवादाला अजिबात थारा नाही. कुराणमध्ये स्पष्ट सांगितले आहे की, ज्याने एका निष्पाप मानवाची हत्या केली त्याने समस्त मानव जातीची हत्या केली. त्याला त्याच्या या कर्माची शिक्षा भोगावीच लागेल. निष्पाप लोकांची हत्या करणारे माथेफिरू हे खरे मुस्लिम असूच शकत नाहीत असे या निवेदनात नमुद करण्यात आले आहे.**

निवेदनावर डॉ. सादीक राजे, अहेमदअली मोमिन, अन्वर हवालदार, महंमद शेख, ॲड. समीर पठाण, युसूफ इनामदार, नदीम पठाण, सुलतान शेख, लतीफ राजे, अमन राजे, दानिषा राजे,अमीर शेख, मोहसीन इनामदार, सरदार पठाण, शकील शेख, डॉ. शब्बीर शेख, जमीर शेख, असिर राजे, कैय्युम शेख, रेहान शेख, समीर शेख, हमजा मोमीन, निसार आतार, समशेर शेख, रेहान कुरेशी, तलीब राजे, साहिल शेख, तन्वीर शेख, हसन राजे, अन्सार सय्यद, रमीज राजे, रशिद शेख आदींच्या सह्या आहेत.

# स्व. विखे यांचे सहकारात उल्लेखनीय कार्य

## दिनेश बाबर यांचे प्रतिपादन

**अळकुटी : प्रतिनिधी**

**शेतकरी हिताचा विचार करून आशिया खंडात पहिला सहकारी तत्वावर सहकारी साखर कारखाना सुरू करणारे पद्मश्री विठ्ठलराव विखे यांचे सहकार क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय असल्याचे प्रतिपादन पंचायत समितीचे मा. सदस्य दिनेश बाबर यांनी केले.**

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या अळकुटी येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात पद्मश्री विठ्ठलराव विखे यांच्या ४५ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बाबर हे बोलत होते. प्राचार्या डॉ. कुंदा कवडे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.

बाबर म्हणाले, पद्मश्री विखे यांनी प्रवरानगर येथे आशिया खंडातील पहिल्या प्रवरा सहकारी साखर कारखान्याची ३१ डिसेंबर १९५० रोजी स्थापना केली. सन १९७४ मध्ये प्रवरा मेडिकल ट्रस्टची स्थापना करून अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांयुक्त भव्य रूग्णालय लोणी येथे सुरू केले. अथक परिश्रमातून दुरदृष्टीने आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना सुरू करणारे विठ्ठलराव विखे यांचा जीवन प्रवास प्रेरणादायी असल्याचे बाबर म्हणाले.




■ अळकुटी महाविद्यालयात पद्मश्री विठ्ठलराव विखे यांच्या ४५ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

डॉ. कवडे म्हणाल्या, महाराष्ट्राला सहकार क्षेत्रात आज जो नावलौकीक प्राप्त झाला आहे त्याचे खरे श्रेय विखे पाटलांना द्यावे लागेल. सहकाराच्या माध्यमातून समाजाचा खऱ्या अर्थाने विकास करता येईल हा विचार पद्मश्रींनी दिल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी महाविद्यालय परिसरात सर्व उपस्थितांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी खरेदी विक्री संघाचे संचालक संग्राम पावडे, प्रसाद शितोळे, उपप्राचार्य प्रा.अमोल नालकर, प्राचार्य प्रा. प्रशांत लोखंडे, प्रा. विशाल रोकडे, प्रा. संजय जाधव, प्रा. सुनिता जाधव, प्रा. पुजा तांबे, प्रा. शिर्मिष्ठा बोरूडे, प्रा. विनायक सोनवणे, प्रा. पोपट सुंबरे, प्रा. दशरथ पानमंद, प्रा. रावसाहेब झावरे, प्रा. पुजा वैरागर, प्रा. सुषमा करकंडे, प्रा. सचिन बलसाने, प्रा. सुप्रिया पारखे, प्रा. मोहन माने, प्रा. पांडुरंग उघडे, प्रा.अनुराधा गाढवे, प्रा. संदीप गेटम, प्रा. प्रियंका दिवटे, प्रा. राजाराम गोर्डे, प्रा. मच्छिंद्र बेलोटे, गोरख घोलप, सुर्यमाला भोर, नितीन घोलप, सुनीता भालेराव, विकास सोनवणे, छाया म्हस्के, राहुल बोरूडे, मनोहर कनिंग्ध्वज, रवींद्र वाघ, शिवाजी कळंबे, पांडूरंग शिरोळे आदी उपस्थित होते. प्रा. विशाल रोकडे यांनी प्रास्ताविक तर प्रा. स्वाती फापाळे यांनी आभार मानले.

# महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथ बुधवारी पारनेरात

## रथयात्रेच्या स्वागतासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन





**पारनेर : प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाच्या वतीने महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथयात्रेचे आयोजन करण्यात आले असून ही रथयात्रा बुधवारी दुपारी ४ वाजता पारनेर शहरात दाखल होत आहे. या यात्रेचे स्वागत करण्यासाठी नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आमदार काशिनाथ दाते यांनी केले आहे.**

रथयात्रेच्या स्वागतानंतर लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. १ मे महाराष्ट्र दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने ६५ व्या महाराष्ट्र दिनानिमित्त गौरवशाली महाराष्ट्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाचा, सामाजिक समतेचा आणि एकत्मतेचा संदेश देणारी ही मंगल कलश यात्रा राज्यभर सुरू आहे. या मंगल कलशामध्ये गड, किल्ले आदी ऐतिहासिक वास्तूंची माती, नद्यांचे पाणी एकत्र करण्यात आले आहे.

धार्मिक उत्सवाबरोबरच भक्तीच्या संगमातून संस्कृतीचा सन्मान करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने या मगंल कलश रथ यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या रथ यात्रेचे स्वागत करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ. दाते यांनी केले आहे.

# पारनेर भूषण पुरस्काराचे गुरूवारी वितरण

## १८ व्यक्ती व संस्थांचा समावेश
## कृषी व जनविकास प्रतिष्ठानची माहिती

**पारनेर : प्रतिनिधी**

**कृषी व जनविकास प्रतिष्ठानच्या वतीने तालुक्यातील १८ व्यक्ती व संस्थांना पारनेर भूषण पुरस्काराने सन्मानीत करण्यात येणार असून खा. नीलेश लंके तसेच राळेगणसिध्दीचे माजी सरपंच सदाशिव मापारी, शिवसेना नेते गुलाबराव नवले यांच्या हस्ते या पुरस्कारांचे १ मे रोजी वितरण करण्यात येणार असल्याचे पत्रकार अरूण आंधळे यांनी सांगितले.**

२रा, पारनेर भूषण पुरस्कार 1 मे

१ मे रोजी सायंकाळी ४ वाजता पारनेर येथील बाजार समिती रस्त्यावरील आनंद मंगल कार्यालयात पुरस्कार सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी दिनेश औटी यांच्या अध्यक्षतेखाली सोमनाथ चौधरी, संकेत ठाणगे, अशोक गायकवाड, महाबली मिसाळ, तुषार ठुबे, स्मिता थोरात या कवींचा सहभाग असलेल्या कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना या पुरस्काराने सन्मानीत करण्यात येणार असून सन्मानचिन्हे, प्रशस्तीपत्र, शाल व श्रीफळ देऊन पुरस्कारार्थींचा गौरव करण्यात येणार असल्याचे अरूण आंधळे यांनी सांगितले.

### हे आहेत पुरस्कारार्थी

**अध्यात्म : बजरंग महाराज आंधळे, ज्योत्स्नाताई मुळे, कृषी : कृषी उत्पन्न बाजार समिती, आदर्श सरपंच : ताराबाई कदम काळकुप, सामाजिक कार्य : डॉ. सुनील औटी, रक्तदान, आरोग्य सेवा : रमीज राजे, महिला पत्रकार : नीलम खोसे, समाजसेवा : बबनराव उंडे, उत्कृष्ट वकृत्व अशोक शिंदे, पर्यटन व साहित्य : टीम आडवाटेचे पारनेर, बचत गट संघटक : वैशाली अडसूळ, दुग्ध व समाजसेवा : संदीप रोहोकले, शैक्षणिक क्षेत्र : शिव मावळे कृतज्ञता प्रतिष्ठान, पारंपारिक कला : दत्ता जाधव, महिला लोककला : मनिषा चव्हाण, बचत गट संघटक : जयश्री पवार, शिक्षण व समाजप्रबोधन प्रशासकीय अधिकारी किसनराव पावडे.**

या कार्यक्रमास मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# १ मे पासून कामगार एकता जनजागृती मोहीम

## शरद पवळे यांची माहिती
## राज्यपातळीवर मोहीम राबविणार

**सुपा : प्रतिनिधी**



**कामगार दिनाचे औचित्य साधून १ मे पासून राज्यातील कामगारांच्या प्रश्नावर जनजागृती मोहीम राबविण्याबरोबरच जनसंपर्क अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते शरद पवळे यांनी दिली.**

पवळे यांनी सांगितले की, अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या कामगारांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. कामगारांचे प्रश्न हे त्यांचे व्यक्तीगत प्रश्न नाहीत तर संपूर्ण राज्याच्या विकासाशी सबंधित आहेत. कामगारांच्या श्रमाच्या जोरावर उद्योग, सेवा आणि शेती क्षेत्र भरभराटीस येते. दुर्देवाने आजही बहुसंख्य कामगार विविध प्रकारच्या समस्यांचा सामना करत आहेत. त्यांच्या अडचणी केवळ आर्थिकच नाहीत तर सामाजिक, मानसिक व आरोग्याशी संबंधित असल्याचे पवळे यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील अनेक कामगार नोकरीच्या शोधार्थ शहरांकडे स्थलांतरीत होतात. त्यांना वस्तीच्या, पाण्याच्या स्वच्छतेच्या आणि शिक्षणाच्या सोयी अत्यंत अपुऱ्या मिळतात. त्यांचे राहणीमान हलाखीचे असते. मानसिक, आरोग्य, दैनंदिन तणाव, अस्थिर नोकरी, कमी वेतन व भविष्याच्या अनिश्चिततेमुळे कामगारांमध्ये मानसिक आरोग्याच्या समस्या वाढत आहेत. त्यातून आत्महत्या, व्यसनधीनता यांसारख्या गंभीर सामाजिक समस्याही उद्भवत असल्याचे पवळे यांचे म्हणणे आहे.

### अभियानात सहभागी व्हा

**कामगारांच्या समस्यांकडे गांभीर्याने पाहून उपाययोजना करणे गरजेचे आहे. कामगारांच्या उज्वल भविष्यासाठी, सुरक्षिततेसाठी एकजुटीने राज्यात नव्या पर्वास सुरूवात कामगारांच्या घामाला न्याय देण्यासाठी, राष्ट्राच्या हितासाठी १ मे पासून कामगार एकता कामगार संरक्षण राज्यव्यापी जनजागृती अभियान राबविण्यात येणार आहे. अभियानात सहभागी होण्यासाठी ८०५५५५१४०३ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

### कामगारांच्या न्यायासाठी

**कामगारांच्या श्रमावर देशाची उन्नत्ती, समृध्दी आणि भविष्य अवलंबून आहे. त्यांचे संरक्षण आणि सन्मान करणे हे प्रत्येक राष्ट्राचे कर्तव्य आहे. त्यामुळे कामगार दिनाचे औचित्य साधून कामगारांचे प्रश्न मार्गी लाऊन त्यांना न्याय देण्यासाठी हे अभियान हाती घेण्यात आले आहे.**

**शरद पवळे**
सामाजिक कार्यकर्ते

# ह्युम मेमोरियल चर्चचा वर्धापनदिन उत्साहात

## विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन



**दैठणे गुंजाळ : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील दैठणे गुंजाळ येथील ह्युम मेमोरियल चर्चचा १४१ वा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चर्चचे प्रमुख धर्मगुरू रेव्ह. सुनिल भांबळ होते. यावेळी अहमदनगर चर्च कौन्सिलचे मॉडरेटर रेव्ह. सनी मिसाळ, रेव्ह. संजय मिसाळ, रेव्ह. रविंद्र सरोदे, कवयित्री सरोज अल्हाट, रूबेन त्रिभुवन, ॲड. राजेश ओहोळ, योहान मकासरे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

या प्रसंगी सुप्रसिद्ध किर्तनकार पा. भरत सूर्यवंशी (लातूरकर) यांनी आपल्या किर्तनातून उपस्थितांना मार्गदर्शन केले. चर्चने १४१ वर्षांपासून मंडळीला दिलेल्या आध्यात्मिक आधाराबद्दल सर्वांनी परमेश्वराचे आभार मानले. कार्यक्रमादरम्यान चर्चच्या सुरू असलेल्या कामासाठी मदत करणाऱ्या व्यक्तींचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी तरुण संघ आणि महिला मंडळाने विशेष मेहनत घेतली. या भाविक मेळाव्यास मोठ्या संख्येने ख्रिस्ती बांधवांनी उपस्थिती लावली.कार्यक्रमाचे आभार आनंद आंग्रे यांनी मानले.

# माजी सरपंच गंगापाटील शेंडकर यांचे निधन

## विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान

**लोणीमावळा : प्रतिनिधी**



**लोणीमावळा गावाचे माजी सरपंच व गावचे ज्येष्ठ कारभारी गंगापाटील सोनबा शेंडकर यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक कार्यात त्यांचा सातत्याने सहभाग होता. गाव व परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी मोठे योगदान दिले.**

गंगापाटील शेंडकर हे मितभाषी असले तरी विकासकामांसाठी ते आग्रही पाठपुरावा करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात. गाव व परिसरातील समस्या, वादविवाद असोत किंवा कौटुंबिक संघर्ष असो, तो गावाच्या पातळीवरच मिटवावा आणि समाजात त्याचे वाईट पडसाद उमटू नयेत यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांना गावकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. स्वभावाने कडक आणि सत्यप्रिय व्यक्तिमत्व म्हणून तालुक्यात त्यांच्या शब्दाला फार मोठे महत्त्व होते. त्यांच्या निधनाने गावाने एक कणखर मार्गदर्शक गमावला आहे.

त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे, पुतणे आणि जावई असा मोठा परिवार आहे. प्रगतीशील शेतकरी नारायण शेंडकर, त्रिंबक शेंडकर, मुंबईतील व्यवसायिक संभाजी शेंडकर व पद्मजा मावळे यांचे ते वडील होत. लोणीमावळा सोसायटीचे विद्यमान उपाध्यक्ष व बालाजी डेअरी फार्मचे संचालक प्रकाशशेठ शेंडकर, शिंदेवाडीतील बालाजी डेअरी फार्मचे संचालक किरण नारायण शेंडकर, कापड व्यवसायिक नामदेव शेंडकर, व्यवसायिक जगन्नाथ शेंडकर, आयसीआयसीआय बँकेचे अधिकारी अविनाश शेंडकर तसेच अक्षय शेंडकर, आणि निघोज येथील स्वाती दत्तात्रय लंके यांचे ते आजोबा होते. गाव व परिसरातील लोकांनी त्यांच्या निधनाबद्दल तीव्र शोक व्यक्त केला आहे.

# निशब्द चित्रपटातून सामाजिक समतेचा संदेश- खंडूजी भुकन

**निघोज : प्रतिनिधी**

**निशब्द चित्रपट हा एक सामाजिक संदेश देणारा असून या चित्रपटाच्या माध्यमातून सामाजिक समतेचा विचार मांडण्यात आला आहे, असे प्रतिपादन या चित्रपटातील प्रमुख कलाकार व माजी उपसभापती खंडूजी भुकन यांनी केले.**

या चित्रपटात खंडूजी भुकन, अंजना दोडके, भक्ती परदेशी, मनोज खाडे आणि प्रेम भुरे यांच्या प्रमुख भूमिका असून रामदास राऊत यांनी लेखन व दिग्दर्शन केले आहे.

याबाबत अधिक माहिती देताना भुकन म्हणाले, "गावामध्ये बागायती जमीन, पैसा व मानसन्मान लाभलेले आनंदराव



पाटील आपल्या कुटुंबासह राहतात. त्यांचा मुलगा कृषी सेवा केंद्र चालवतो, तर मुलगी हुशार असल्याने तीला अधिकारी बनवण्याचे स्वप्न ते पाहतात. मात्र मुलगी गावातील मोटारसायकल दुरुस्ती करणाऱ्या तरुणाबरोबर पळून जाते आणि लग्न करते. यामुळे पाटलांची मानहानी होते. सर्व काही देऊनही अशी परिस्थिती ओढवल्याने त्यांना दुःख होते."

"मुलींना शिक्षण, सन्मान व समान संधी मिळावी, असा सामाजिक संदेश देणाऱ्या वडिलांनाच स्वतः च्या मुलीच्या निर्णयामुळे मानसिक धक्का बसतो. पुढे ती मुलगी त्रासाला सामोरी जाते. हीच वास्तव परिस्थिती या चित्रपटातून दाखवण्यात आली आहे," असे भुकन यांनी स्पष्ट केले.गेल्या काही दिवसांपासून निशब्द हा चित्रपट सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे. सध्या तो छोट्या पडद्यावर दाखवला जात असून लवकरच तो शहरातील चित्रपटगृहात प्रदर्शित होणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com